Complaint UILP No.24/2017
Below Exh.:-U-36

शपथेवरून सुरू.

नांव: संजय गंगाराम दगडे वय: ५५ वर्षे
व्यवसाय : काही नाही रा. शिरवळ.

मी माझे पुराव्याचे शपथपत्र निशाणी यु—३६ ला दाखल केले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

दिनांक ०९/०१/२०२६ (शाम वि. सुर्यवंशी)
सदस्य,
ठिकाण: सातारा. औद्योगिक न्यायालय, सातारा.

**जाबदार क्रमांक १ यांचे विधीज्ञ श्री मनोज सुर्यवंशी यांचेकडुन साक्षीदाराचा उलटतपास**

१. प्रतिवादी क्रमांक २ संघटना ही प्रतिवादी क्रमांक १ यांचेकडे मान्यताप्राप्त संघटना आहे याबाबत मला कल्पना नाही. मी १९९६ साली नोकरीस लागलो. त्यानंतर मी प्रतिवादी क्रमांक २ संघटनेचा सभासद झालो. प्रतिवादी क्रमांक २ सघटनेने प्रतिवादी क्रमांक १ यांचेसोबत वेळोवळी कर्मचा—यांच्या सेवाशर्तीसंदर्भात करार केलेले आहेत याची मला कल्पना नाही. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचेदरम्यान करार झालेनंतर वेतनवाढ होत होती याबाबत मला सांगता येणार नाही. मी का सांगू शकत नाही हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी जाणीवपूर्वक खोटा जबाब देत आहे. मला आता दिनांक २२/०८/२०१७ रोजीचा कराराची मूळ प्रत दाखविण्यात आली. सदर कराराप्रमाणे वेतनवाढी झाली याबाबत मी सांगू

शकत नाही कारण सदर कराराबाबत मला काही माहिती नाही. सदर कराराची झेरॉक्स प्रत निशाणी सी—५ए अनुक्रमांक १० ला आहे. २२/०७/२०१७ पूर्वी आमचे पगार १८ ते १९ हजारचे दरम्यान होते. त्यानंतर आम्हास नोकरीवरून काढून टाकेपर्यंत तेवढाच पगार होता. आमचा पगार बॅक खात्यामध्ये केला जात होता. माझे बॅकेचा उतारा मिळाल्यानंतर मी दाखल करण्यास तयार आहे.

जाबदार क्रमांक १ यांचे विधीज्ञ यांचे विनंतीवरून पुढील उलटतपासासाठी तहकूब.

दिनांक ०९/०१/२०२६ (शाम वि. सुर्यवंशी)
सदस्य,
ठिकाण: सातारा. औद्योगिक न्यायालय, सातारा.

शपथेवरून पुढे सुरू.

**जाबदार क्रमांक १ यांचे विधीज्ञ श्री जोशी यांचेकडुन साक्षीदाराचा उलटतपास पुढे सुरू.**

२. या न्यायालयात दाखल केलेली तक्रार मी वाचलेली नाही. साक्षीदार पुन्हा सांगतात की मी तक्रार वाचलेली आहे परंतु ती मला आठवत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की प्रस्तुत तक्रार संघटनेच्या वर्गणीची कपात होवून नये तसेच सेवाशर्तीमध्ये बदल होवू नये या करीता दाखल केली आहे. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचेदरम्यान सेवाशर्तीबाबत दिनांक २२/०८/२०१७ रोजी करार झाला किंवा कसे याची मला कल्पना नाही.

मला आता रेफरन्स आयडीए क्रमांक २५/२०२१ मधील माझा उलटतपास दाखविण्यात आला. त्यामध्ये दिनांक २२/०८/२०१७ रोजी करार झाल्याचे मी मान्य केले आहे याबाबत मला कल्पना नाही. सदरचा करार आम्ही कोणत्याही न्यायालयामध्ये आव्हानीत केलेला नाही. सदर सरतपास व उलटतपासाची प्रत कामी दाखल करण्यात घेण्यात येवुन त्यास निशाणी सी— देण्यात येत आहे. कामगार न्यायालयामध्ये मी खोटा जबाब दिला आहे हे मला आठवत नाही. माझे शिक्षण १०वी झाले आहे.

३. मला आता निशाणी यू—३९ दाखविण्यात आले. सदर उता—यावर माझे नांव आहे. त्यामुळे ते स्टेटमेंट माझे आहे. त्यावर माझे नांव व अकौंट नंबर इंग्रजीमध्ये लिहीले आहे. प्रतिवादी क्रमांक २ संघटनेचा मी सभासद होतो. सदर संघटनेसोबत कंपनीचे किती करार झाले याची मला कल्पना नाही. सदर संघटनेसोबत एकुण ७ करार झाले याबाबत मला सांगता येणार नाही. सदर करार मी कोणत्याही न्यायालयात आव्हानीत केलेले नाही. प्रतिवादी क्रमांक २ संघटना प्रतिवादी क्रमांक १ आस्थापनेसाठी मान्यताप्राप्त संघटना आहे याची मला कल्पना नाही. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये जाबदार क्रमांक २ मान्यताप्राप्त संघटना नमुद केले आहे ते चुकीचे आहे याबाबतीत मला माहिती नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की मी कोणतीही माहीती न घेता पुरावा सादर केला आहे.

४. मी तक्रारदार संघटनेचा २०१७ साली सभासद झालो. माझेकडे सभासदत्वाचा अर्ज आहे. तो मी या कामी दाखल केला आहे. तो मी दाखवू शकत नाही. मी जाबदार क्रमांक २ संघटनेचा राजीनामा कधी दिला हे मला सांगता येणार नाही. मी तक्रारदार संघटनेची घटना वाचली आहे परंतु ती माझे लक्षात नाही. सभासदत्वाबददल त्यामध्ये काय तरतूद आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की मी तक्रारदार संघटनेचे सभासदत्व कधीही घेतले नाही. मी भारतीय मजदूर संघाचे सभासदत्व घेतले सदर संघटना व तक्रारदार संघटना दोन्हीही एकच आहे.

५. तक्रारदार यांनी जाबदार क्रमांक २ ची मान्यता रदद व्हावी किंवा त्यांचे अधिकार काढुन घेण्यात यावेत म्हणुन कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. कोणत्याही न्यायालयाने सदर संघटनेची मान्यता अथवा नोंदणी काढुन घेतली आहे किंवा नाही याची मला कल्पना नाही. जाबदार क्रमांक २ संघटना आज देखील जाबदार क्रमांक १ यांचेसाठी मान्यताप्राप्त संघटना आहे याची मला कल्पना नाही.

६. माझे पगारातील सभासद वर्गणी कपात होवून जाबदार क्रमांक २ संघटनेकडे पाठविली जात होती. सदर कपात करणेत येवु नये म्हणुन या न्यायालयाने अथवा इतर कोणत्याही न्यायालयाने मनाई आदेश केलेला नाही. सदरची कपात जाबदार क्रमांक १ यांनी कधी बंद केली हे मला आठवत नाही. सदर कपात बंद केली किंवा कसे हे देखील मला आठवत नाही. हे

म्हणणे बरोबर आहे की मला नोकरीवरून कमी केल्यानंतर माझे पगारातील कपात बंद करण्यात आली. जाबदार क्रमांक २ यांनी तक्रारदार संघटना व त्यांचे पदाधिकारी यांचेविरूध्द फौजदारी तक्रार दाखल केली होती याची मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की मी स्वत: काही कामगारांच्या घरी जावून भारतीय मजदूर संघाचे सभासद म्हणुन त्यांचे जबरदस्तीने अथवा स्वखुशीने सहया घेतल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, काही कामगारांची जबरदस्तीने जाबदार क्रमांक २ संघटनेच्या सभासदत्वाचे राजीनामापत्रे / शपथपत्रे तयार करून घेतली. जाबदार क्रमांक २ यांनी नोटरी विरूध्द योग्य ठिकाणी तक्रार केली आहे याची मला कल्पना नाही. सदर तक्रार किती रकमेच्या कपातीविरूध्द आहे तो नेमका आकडा मला सांगता येणार नाही. अंदाजे सदर रक्कम रूपये ६०० चे आसपास आहे. सदर रक्कम जाबदार क्रमांक २ यांनी धनादेशाद्वारे दिली होती. सदर धनादेश आम्ही वठविला नाही. तो का वठविला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. आजरोजी जाबदार क्रमांक २ यांनी सदर रक्कम दिलेस ती मी स्विकारणेस तयार आहे. तसे कोणतेही पत्र मी जाबदार क्रमांक २ यांना दिलेले नाही.

७. हे म्हणणे चुकीचे आहे की माझा वाद हा तक्रारदार व प्रतिवादी कमांक २ यांचेमधील आहे व प्रतिवादी क्रमांक १ यांना खोटया कारणास्तव पक्षकार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की १३३ कर्मचा—यांनी जाबदार क्रमांक २ संघटनेचा राजीनामा दिला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे

खरे नाही की जाबदार क्रमांक १ यांनी तक्रारदार संघटनेबरोबर करार करावा म्हणुन खोटया कारणास्तव ही तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा आहे व मी खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास जाबदार क्रमांक २ तर्फे श्री.दिनेश तोडकर यांचेतर्फे सुरू.**

८. तक्रारीमध्ये काय लिहीले आहे हे मी वकीलांकडून समजून घेतलेले आहे. सदर तक्रारीमध्ये जाबदार क्रमाक २ यांचेविरूध्द कोणतीही दाद मागितलेली नाही. जाबदार क्रमांक २ ही जाबदार क्रमांक १ यांचेकडे मान्यताप्राप्त संघटना आहे याची मला कल्पना नाही. मी १९९६ ते २०१९ अखेर जाबदार क्रमांक १ यांचेकडे नोकरी केली आहे. सदर कालावधीमध्ये सेवाशर्तीसंदर्भातील करार जाबदार क्रमांक १ व २ यांचेदरम्यान झालेले आहेत. सदर कराराप्रमाणे सोयीसुविधा मला मिळालेल्या आहेत.

९. तक्रार अर्जातील १३३ कामगारांचेकडून जाबदार क्रमांक २ यांनी कधीही वर्गणी घेतलेली नाही. किसन गावडे व प्रकाश सोनवणे यांना मी ओळखतो. त्यांची सभासद वर्गणी जाबदार क्रमांक २ यांनी धनादेशाद्वारे परत केली याची मला कल्पना नाही. त्यांचे व जाबदार क्रमांक २ यांचे दरम्यान वर्गणी संदर्भाने झालेल्या व्यवहाराची मला कल्पना नाही. मला आता निशाणी सीबी—१८ सोबत पान क्रमांक ९२ व ११४ ला असलेली यादी दाखविण्यात आली. सदर यादीतील १८ व १२ कर्मचा—यांना त्यांची सभासद वर्गणी

जाबदार क्रमांक २ यांनी धनादेशाद्वारे परत केल्याची मला कल्पना नाही. सदर १८ व १२ कर्मचारी व जाबदार क्रमांक २ यांचे दरम्यान वर्गणी संदर्भाने झालेल्या व्यवहाराची मला कल्पना नाही. मला आता निशाणी सीबी—१८ सोबतचे पान क्रमांक ११५ ते १३२ ला असलेले पत्र व धनादेश दाखविण्यात आले त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास निशाणी अनुक्रमे सीबी— ते सीबी— देण्यात आले व पान क्रमांक ९२ आणि ११४ यांना निशाणी सीबी— व सीबी——— देण्यात आले. मला आता निशाणी सीबी—१८ सोबतचे पान क्रमांक १३३ ते १६७ ला असलेले पत्र व धनादेश दाखविण्यात आले त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे निशाणी सीबी— ते सीबी—— देण्यात आले. वरील पत्रव्यवहार व धनादेश यांना तक्रारदार यांनी कोणत्याही प्रकाराचा प्रतिसाद दिलेली नाही हे म्हणणे बरोबर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की सदर पत्रव्यवहार व धनादेश तक्रारदार यांना मान्य होते म्हणुन तक्रारदार यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

१०. मी ३ जून २०१७ रोजी तक्रारदार संघटनेचा सभासद झालेबाबतचा पुरावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की सभासद झालेबाबत व त्यांची संख्या जाबदार क्रमांक २ यांचे संख्यपेक्षा जास्त असलेबाबत मी खोटे सांगत आहे. तक्रारदार यांनी जाबदार क्रमांक १ यांचे बरोबर केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जाबदार क्रमांक २ यांना दिलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार क्रमांक १ व २ यांनी संगनमत

केल्याचे खोटे नमुद केले आहे. सहा.कामगार आयुक्त कार्यालयाने माझे शपथपत्रातील कलम ५ मध्ये नमुद केलेल्या प्रकरणामध्ये जाबदार क्रमांक २ यांना कधीही बोलविले नव्हते. माझे शपथपत्रातील कलम ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे जाबदार क्रमांक २ यांचे वकीलांनी दाखल केलेल्या म्हणण्यास आम्ही आजअखेर कधीही हरकत घेतलेली नव्हती. जाबदार क्रमांक २ यांचे धनादेश का वठविले नाही याचे कारण मी दिलेले नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की तक्रारदार व जाबदार क्रमांक १ यांचेमध्ये वाद असुन नाहकपणे जाबदार क्रमांक २ यांना पक्षकार करण्यात आले आहे व कारण नसतांना जाबदार क्रमांक २ यांचेविरूध्द मी जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा जबाब देत आहे.

उलटतपास संपला. पुन:तपास काही नाही.

दिनांक २३/०१/२०२६

ठिकाण: सातारा.

(शाम वि. सुर्यवंशी)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, सातारा.